# उद्या साय-फाय आर्ट्स फेस्टिव्हल

**पुणे** : सायबर सुरक्षेला चालना देण्यासाठी युवा अभिव्यक्तीच्या ताकदीच्या साहायाने समाजात एक अमीट ठसा उमटविणे, या उद्देशासाठी साय-फाय आर्ट्स फेस्टिव्हल २०१९ ची घोषणा करण्यात आली आहे. यासाठी क्विक हीलने महाराष्ट्र सायबर आणि विश्वकर्मा विद्यापीठाच्या सहकार्याने विश्वकर्मा विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये शनिवारी (दि.१६ नोव्हेंबर) हा महोत्सव आयोजित केला आहे. राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेचे माजी अधिष्ठाता प्रा. समर नखाते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सायबर सुरक्षेला चालना देण्यासाठी युवा अभिव्यक्तीच्या ताकदीच्या साहायाने समाजात एक अमीट ठसा उमटविणे, असा उद्देश असलेला साय-फाय आर्ट्स फेस्टिव्हल हा कलात्मकता आणि सर्जनशीलतेचा अनोखा उत्सव आहे. सायबर विश्वातील मनुष्य जीवन यावर यंदा भर असून; लघुपट, भित्तीपत्रके, कथाकथन आणि निबंध अशा विविध कलाप्रकारांतील आविष्कार या महोत्सवात घडेल. सायबर सुरक्षेची गरज याबाबत नवयुगातील डिजिटल आशयाचा आविष्कार यातून घडेल. प्रतिष्ठित परीक्षकांच्या समितीने लघुयादीत समावेश केलेले स्पर्धक यामध्ये सहभागी होतील. तर डिजिटल प्रथम असे ब्रीद असलेल्या या महोत्सवातील स्पर्धकांचे समाज माध्यमावर प्रेक्षकांकडूनही मूल्यमापन करण्यात येईल. हा उपक्रम पदवी, पदव्युत्तर आणि कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना; तसेच व्यावसायिक, मुक्तपणे काम करणारे आदींनाही खुला आहे, असे क्विक हील टेक्नॉलॉजीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कैलास काटकर यांनी सांगितले.